सोमवार, दि. १२ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १३६ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# निवडणुकीच्या रिंगणात ‘लाडकी बहीण’ योजनेचा कार्ड

## आचारसंहितेचा भंग की केवळ प्रचार?

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिका निवडणुकीचे बिगुल वाजण्यापूर्वीच राजकीय वातावरण तापू लागले आहे. नुकत्याच समोर आलेल्या एका निवडणूक जाहिरातीने प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात मोठ्या वादाला तोंड फोडले आहे. शिवसेना (शिंदे गट) उमेदवार सौ. पूजा लक्ष्मण वर्मा यांच्या नावाने प्रसिद्ध झालेल्या एका बॅनरवर लाडक्या बहिणींच्या खात्यात ३००० रुपये जमा होणार असा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. आता हा मुद्दा निवडणूक आयोगाच्या रडारवर येण्याची शक्यता आहे.

**काय आहे जाहिरातीतील मजकूर?**

पॉम्पलेटमधील जाहिरातीत उमेदवाराचा प्रचार करताना, वरच्या बाजूला राज्य सरकारच्या योजनेचा दाखला दिला आहे. त्यात म्हटले आहे की, १४ जानेवारी पूर्वी लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात डिसेंबर आणि जानेवारी महिन्याचे ३००० रुपये जमा होणार. विशेष म्हणजे या जाहिरातीवर 'निवडणूक-२०२६' असा ठळक उल्लेख असून शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्ह देखील आहे.

निवडणूक आयोगाचे नियम काय सांगतात? भारतीय निवडणूक आयोगाच्या 'आदर्श आचारसंहिते'नुसार, निवडणूक काळात कोणतेही प्रलोभन दाखवणे हा गुन्हा मानला जातो.

कोणत्याही उमेदवाराला मतदारांना रोख रक्कम किंवा आर्थिक लाभाचे आश्वासन देऊन मत मागता येत नाही. जरी ही सरकारी योजना असली, तरी तिचा वापर स्वतःच्या प्रचारासाठी आणि पैसे जमा होणार असे सांगून करणे हे मतदारांच्या निर्णयावर प्रभाव टाकणारे ठरू शकते.

सरकारी योजना ही जनतेच्या टॅक्सच्या पैशातून असते. कोणत्याही एका पक्षाला किंवा उमेदवाराला त्या योजनेचे श्रेय अशा प्रकारे घेता येत नाही ज्यामुळे निष्पक्ष निवडणुकीच्या तत्त्वाचा भंग होईल.

लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ च्या कलम १२३ नुसार, मतदारांना लाच देणे किंवा तसे आश्वासन देणे हा 'भ्रष्ट सराव' (Corrupt Practice) मानला जातो.

जिल्हा निवडणूक अधिकारी काय कारवाई करू शकतात? या प्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यास किंवा आयोगाने स्वतःहून दखल घेतल्यास खालील कारवाई होऊ शकते.

सर्वप्रथम संबंधित उमेदवाराला नोटीस देऊन २४ ते ४८ तासांत स्पष्टीकरण मागवले जाते.

प्रलोभन दाखवल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता (BNS) आणि निवडणूक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल होऊ शकतो.

जर आचारसंहितेचा गंभीर भंग झाला आहे असे सिद्ध झाले, तर निवडणूक आयोग संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवतो.

अशी सर्व पोस्टर्स आणि बॅनर जप्त करण्याचे आदेश जिल्हा निवडणूक अधिकारी देऊ शकतात.

सत्ताधारी पक्षाचे म्हणणे असे असू शकते की, ही योजना आधीच जाहीर झालेली आहे आणि आम्ही फक्त त्याची माहिती देत आहोत. मात्र, तज्ज्ञांच्या मते, जाहिरातीवर 'निवडणूक-२०२६' आणि उमेदवाराचा फोटो असणे हे स्पष्टपणे निवडणूक प्रचारासाठी सरकारी योजनेचा आणि पैशांचा वापर दर्शवते, जे कायद्याच्या चौकटीत टिकणारे नाही.

जालना महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर '३००० रुपयांचे' हे कार्ड उमेदवाराला मतं मिळवून देणार की कायदेशीर कचाट्यात अडकवणार, हे आता जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर अवलंबून आहे. सध्या तरी या जाहिरातीमुळे सोशल मीडियावर 'आचारसंहिता फक्त नावापुरतीच का?' असा सवाल विचारला जात आहे.




# प्रभाग १४ मध्ये तुतारीचा निनाद ; सत्तापरिवर्तनाची लाट

## लखन जांगडे आणि जयंत भोसले यांची जोरदार मुसंडी

**जालना । प्रतिनिधी -** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत प्रभाग क्रमांक १४ मध्ये राजकीय वातावरण कमालीचे तापले असून, यावेळी मतदारांनी प्रस्थापितांना धक्का देण्याचे मन बनवल्याचे चित्र दिसत आहे. प्रभाग १४ 'ब' मधून लखन जांगडे आणि १४ 'ड' मधून जयंत भोसले या उमेदवारांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली असून, बदल हवा या घोषणांनी प्रभाग दुमदुमून गेला आहे. वाजणार तुतारी, जनता करणार कमळाबाई उताणी अशा प्रतिक्रिया जनसामान्यांतून व्यक्त होत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून सत्तेत असलेल्या जुन्या नगरसेवकांनी प्रभागाच्या सर्वांगीण विकासाऐवजी केवळ स्वतःच्या आर्थिक हिताची 'गुत्तेदारी' (कॉन्ट्रॅक्ट्स) जपल्याचा आरोप नागरिक उघडपणे करत आहेत. रस्ते, पाणी आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करून केवळ निविदा आणि कंत्राटांमध्येच रस घेतल्याने जनतेमध्ये तीव्र असंतोष आहे.

या निवडणुकीत मुक्तेश्वर महादेव मंदिराच्या जागेचा प्रश्न सर्वात कळीचा ठरला आहे. मंदिराच्या मालकीची जागा बळकावण्याचा प्रयत्न माजी नगरसेवकांनी केल्याचा आरोप होत असून, यामुळे शिवभक्त आणि स्थानिक नागरिक मोठ्या प्रमाणात संतापले आहेत. धार्मिक स्थळाच्या जागेचा विकास करण्याच्या नावाखाली ती गिळांकृत करण्याचा प्रयत्न जनता सहन करणार नाही, अशा भावना प्रभागातील ज्येष्ठ नागरिक व्यक्त करत आहेत. तसेच, याच जागेवर इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करून, त्याद्वारे अवाजवी शुल्काची (फी) आकारणी सुरू केल्याने पालकांमध्येही नाराजी आहे. शिक्षणाचे साधन हे समाजसेवेचे माध्यम न राहता केवळ 'पैसे कमावण्याचे साधन' बनल्याने सर्वसामान्य मध्यमवर्गीय मतदारांनी आता नवीन चेहऱ्यांकडे पाहण्यास सुरुवात केली आहे.

सध्याची जनभावना पाहता, मतदारांनी नवीन आणि अभ्यासू चेहऱ्यांना संधी देण्याचे ठरवले आहे. लखन जांगडे आणि जयंत भोसले यांना मिळणारा वाढता पाठिंबा पाहता, या प्रभागात 'तुतारी'चा आवाज घुमणार आणि परिवर्तनाची नांदी होणार, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# जालना शहराला स्मार्ट सिटी बनविण्यासाठी महापालिकेत भाजपची एक हाती सत्ता द्यावी - रावसाहेब दानवे

## प्रभाग १३ मधील उमेदवारांच्या प्रचारार्थ मतदारांशी संवाद

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहराला स्मार्ट सिटी बनविण्यासाठी भाजपची एक हाती सत्ता जालना महापालिका निवडणुकीत देऊन भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी जालना येथील भाजपा उमेदवाराच्या प्रभाग क्र.१३ व प्रभाग क्रमांक १६ मधील उमेदवाराच्या प्रचारार्थ केली जालना शहरातील प्रभाग क्र.१३ व १६ मधील उमेदवाराच्या प्रचारार्थ माजी राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी मतदारांशी संवाद साधताना केले.

ते म्हणाले की केंद्रात व राज्यात भाजपचे सरकार आहे, त्यामुळे महापालिकेत केंद्र व राज्य शासनाकडून विकास कामासाठी निधी आणण्यासाठी जालना महापालिकेत भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करावे. मतदारांची संवाद साधताना दानवे म्हणाले मी २०१४ पासून केंद्रात पंतप्रधान नरेंद्रजी मोदी असताना व राज्यात देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री असताना मी केंद्रात राज्यमंत्री व भाजपचा प्रदेशाध्यक्ष असताना जालना शहरासाठी रेल्वे स्थानकाला नवीन इमारतीसाठी २०० कोटी रुपये मंजूर केले व ते काम प्रगतीपथावर आहे, जालना येथून मुंबईसाठी नवीन वंदे भारत रेल्वे सुरु केली, शंभर कोटीचे रेल्वे पिट लाईन, सरस्वती कॉलनी व सहकार बँक कॉलनीकडे जाणाऱ्या रेल्वे भुयारी मार्गास दोन कोटी काम पूर्ण झाले, देशातील तिसरे आयसिटी कॉलेज जालना येथे आणले, शासकीय व वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करून काम प्रगतीपथावर आहे, जायकवाडी जालना पाणीपुरवठा योजनेसाठी २०० कोटी, जालना शहरातील अंतर्गत पाणीपुरवठासाठी पाईपलाईन व **पान २ वर**

# भाजप उमेदवाराला सौ. वैशाली पांगारकर यांचा जाहीर पाठिंबा

प्रभाग क्रमांक १३ अ (ना.मा.प्र. महिला राखीव) मधून अपक्ष उमेदवार म्हणून नामनिर्देशन दाखल केलेल्या सौ. वैशाली लक्ष्मीकांत पांगारकर यांनी भाजपाच्या अधिकृत उमेदवार सौ. भाग्यश्री सुजितकुमार जोगस यांना जाहीर पाठिंबा दिला आहे.

यासंदर्भात सौ. पांगारकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे की, त्यांनी प्रभाग क्रमांक १३ अ मधून नामनिर्देशन दाखल केले होते. मात्र काही अपरिहार्य कारणांमुळे नामनिर्देशन पत्र परत घेण्यासाठी निर्धारित वेळेपेक्षा अवघ्या दहा मिनिटांचा उशीर झाल्याने त्यांना अर्ज मागे घेता आला नाही.

सौ. पांगारकर या भारतीय जनता पार्टीच्या सक्रीय सदस्य असून भाजपाच्या विरोधात निवडणूक लढवण्याचा आपला कोणताही हेतू नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे त्यांनी भाजपाच्या अधिकृत उमेदवार सौ. भाग्यश्री सुजितकुमार जोगस यांना जाहीर पाठिंबा जाहीर केला आहे. तसेच प्रभाग क्रमांक १३ अ मधील सर्व मतदार बांधवांना आवाहन करताना त्यांनी भारतीय जनता पार्टीच्या कमळ या निवडणूक चिन्हावर मतदान करून सौ. भाग्यश्री सुजितकुमार जोगस यांना विजयी करण्याचे आवाहन केले आहे. यासोबतच प्रभाग क्रमांक १३ मधील भारतीय जनता पार्टीच्या सर्व उमेदवारांना कमळ या निशाणीवर मतदान करून विजयी करण्याची विनंतीही त्यांनी केली आहे.

> प्रभाग १३ च्या चारही उमेदवारांची प्रचारात आघाडी घेतली असून सौ. वैशाली पांगारकर यांचा पाठिंबा मिळाल्याने आता भाजपाच्या चारही उमेदवारांची ताकद वाढली आहे. त्यामुळे या प्रभागात भाजपाकडून चारही उमेदवारांच्या विजयाच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.




# मंठ्यात ‘लाडकी बहीण’चा जल्लोष!

## रांगोळी-सेल्फी स्पर्धेतून महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव; १०४ बक्षिसांची ऐतिहासिक उधळण

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा तालुक्याच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असा एक अभूतपूर्व उपक्रम श्री राहुल भैया लोणीकर मित्र मंडळ, मंठा तालुका यांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. महिलांच्या सक्षमीकरणाचा ठाम संदेश देणारी लाडकी बहीण भव्य रांगोळी व सेल्फी स्पर्धा ही स्पर्धा मंठ्यात पहिल्यांदाच होत असून, या कार्यक्रमाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष वेधले गेले आहे.

हा भव्य उपक्रम राजमाता जिजाऊ जन्मोत्सव, मकर संक्रांत आणि भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल भैया लोणीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात येत असून, रविवार, दिनांक १२ जानेवारी २०२६ सकाळी १० वाजता, सरस्वती मंगल कार्यालय, मंठा येथे हा महिलांचा सन्मान सोहळा रंगणार आहे.

**महिलांच्या सन्मानातून सक्षमीकरणाचा संदेश**

महिला ही केवळ कुटुंबाची आधारस्तंभ नसून समाजाच्या प्रगतीची खरी शिल्पकार आहे. तिच्या कलागुणांना, आत्मविश्वासाला आणि कर्तृत्वाला मंच देणे ही काळाची गरज ओळखून हा उपक्रम राबविण्यात आला आहे. रांगोळीच्या माध्यमातून महिलांच्या कल्पकतेचा आविष्कार, तर सेल्फी स्पर्धेच्या माध्यमातून महिलांच्या आनंदी सहभागाचे दर्शन घडणार आहे.

रांगोळी ही स्त्रीच्या संयम, सौंदर्यदृष्टी आणि संस्कृतीशी असलेल्या नात्याचे प्रतीक आहे. या स्पर्धेमुळे महिलांना घराबाहेर येऊन स्वतःच्या कलेचा अभिमानाने परिचय करून देण्याची संधी मिळणार आहे.

**बक्षिसांचा विक्रम; महिलांसाठी ऐतिहासिक संधी**

या स्पर्धेतील सर्वात मोठे आकर्षण म्हणजे एकूण १०४ बक्षिसांची विक्रमी बक्षीसयोजना. घरगुती वापरासाठी उपयुक्त व मौल्यवान अशा या बक्षिसांमुळे महिलांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला आहे.

१ चार्जिंग स्कूटी - सौ. वंदना वैजनाथ बोराडे
४ फ्रिज - सौ. स्नेहा अजय अवचार
४ वॉशिंग मशीन - सौ. भारती दौलत शहाणे
२१ मिक्सर - सौ. उर्मिला बाळासाहेब तौर
२१ कुकर - सौ. चंद्रभागा विठ्ठलराव काळे
२१ डिनर सेट - सौ. उर्मिला सुरेशराव सरोदे
११ इलेक्ट्रिक शेगडी - सौ. दुर्गा गणेश बोराडे

तसेच सेल्फी स्पर्धेसाठी श्री भूषण कासट (राजेश वस्त्र भंडार) यांच्या वतीने २१ पैठणी देण्यात येणार आहेत. या सर्व मिळून एकूण १०४ आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. सामाजिक सहकार्यामुळे कार्यक्रमाला व्यापक स्वरूप मिळाले असून या कार्यक्रमाच्या

# संपादकीय पान

## मुला मुलींनो समाजात आई-वडिलांची किंमत ठेवा...

आजकालची मुले मुली पार बिघडून गेली आहेत. सार्वजनिक ठिकाणी आपल्या वाईट वर्तनाचे ओंगळवाणे प्रदर्शन करून आई-वडिलांच्या नावाला कलंक लावत आहेत. ज्या आई-वडिलांनी आपल्याला जन्माला घालून लहानाचे मोठे केले, नंतर शाळेत शिकायला पाठवून उच्च शिक्षण शिकवले. पण तुम्ही जर आई-वडील शिकवत असलेल्या उच्च शिक्षणाचा वापर आई वडिलांचे नाव रोशन करण्याऐवजी प्रेमाचा व व्यसनाचा बाजार मांडण्यासाठी करत असाल तर तुमच्या एवढा नीच माणूस पृथ्वीतलावर दुसरा कोणीच नाही. गावातील शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर बहुतांश विद्यार्थी पुढील उच्च शिक्षणासाठी शहरी भागात जातात. आई वडील त्यांना भरमसाठ पैसा ओतून चांगल्या कॉलेजला व चांगल्या शिकवणीला पाठवतात. दर महिन्याला आपल्या मुला मुलींना लागेल तेवढा पैसा शेतात काबाडकष्ट करून व घाम गाळून शिक्षणाच्या नावावर पाठवतात. परंतु आज कालची मुले मुली आई-वडिलांनी पाठवलेला पैसा शिक्षणासाठी कमी पण पार्ट्या करण्यासाठी व दारू व मटन खाण्यासाठी अधिक करतात. बरेच विद्यार्थी शहरी भागात शिक्षणासाठी ठेवल्यास फुल दारू पिऊन एसटी बस स्टँड मध्ये किंवा दारूच्या दुकानापुढे झोपलेले आपण बघितलेच असेल. शाळा व कॉलेज करायचे सोडून कॉफी शॉपला जाणे, पर्यटन स्थळे पाहणे, मित्रांचे बर्थडे साजरे करणे, बारवर जाऊन दारू ढोसणे असे प्रकार आजकालची मुले शहरी भागात शिक्षणाच्या निमित्ताने ठेवल्यावर हमखास करतात. असे प्रकार केवळ मुलेच करत नाहीत तर मुली देखील असे कारणामे करायला मुलांपेक्षा काही कमी नाहीत. ज्या आई-वडिलांनी आपण खूप खूप शिकावे म्हणून आपल्याला चांगल्या व नामांकित कॉलेजला प्रवेश घेऊन दिला. चांगली शिकवणी आपल्याला लावून दिली. पण आपण कॉलेजला व शिकवणीला जाण्याऐवजी टुकार पोरांसोबत दारू पीत व पार्ट्या खात फिरू लागलो तर आपण आई-वडिलांच्या स्वप्नावर पाणी टाकत आहात, आई-वडिलांचा अपेक्षाभंग करत आहात, व्यसनी बनून रोज दारू पिऊन फिरू लागल्यामुळे व एसटी बस स्टॅन्ड मध्ये व दारूच्या दुकानापुढे दारू पिऊन लोळू लागल्यामुळे आपण आई-वडिलांच्या नावाचा चुराडा करत आहोत म्हणून समजा. आपल्या अशा व्यसनी व टुकार वागण्यामुळे आपण स्वतःच्या हाताने आई-वडिलांची किंमत कमी करत आहोत. मुली सुद्धा शिक्षणाच्या नावाखाली आई-वडिलांकडून दर महिन्याला भरपूर पैसा उकळतात. आणि तो पैसा मित्रांच्या, बॉयफ्रेंडच्या व मैत्रिणीच्या बर्थडेला पार्ट्यावर उधळतात. म्हणजे आताची मुले मुली शिक्षणाच्या नावाखाली आई-वडिलांचे रक्त पीत आहेत. मित्रांनो व मैत्रिणींनो आई वडील आपल्याला शेतात खूप कष्ट करून व घाम गाळून शिक्षणासाठी पैसा पाठवत असतात. त्यासाठी सावकाराचे कर्ज काढून आपल्याला दर माही न चुकता पैसा पाठवत असतात. तेव्हा आपण देखील आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून खूप खूप अभ्यास केला पाहिजे. जिद्दीने पेटून उठून अभ्यासाच्या नादी लागले पाहिजे. परंतु शिक्षणाच्या नावाखाली प्रेमाच्या विळख्यात अडकून बसले नाही पाहिजे. नाहीतर शिक्षणाच्या नावाखाली प्रेमाचा बाजार मांडून आई-वडिलांच्या माघारीच स्वतःच्या मनाने पळून जाऊन लव मॅरेज केले तर आई-वडिलांच्या नावाची किंमत तुम्ही खराब करत आहात म्हणून समजा. त्यासाठी मुला मुलींनी आई-वडिलांच्या नावाला कलंक लावता कामा नये. समाजात आई-वडिलांची मान खाली जाईल असे वागता कामा नये. आपल्यामुळे आई वडिलांची मान गर्वाने वर जाईल आणि त्यांची छाती अभिमानाने फुगून येईल असे काम करावे. तरच खऱ्या अर्थाने आई-वडिलांच्या मनाला समाधान वाटेल... आणि त्यांचा आनंद गगनात न मावणारा असेल... त्यासाठी जाता जाता समस्त मुला मुलींना विनंती करतो की, आपण आई वडिलांना फसवून आई-वडिलांचे आर्थिक व शारीरिक शोषण करू नका..खूप खूप अभ्यास करून आई-वडिलांचे स्वप्न साकार करा...प्रेमाच्या मायाजालात अडकून स्वतःचे जीवन बरबाद करून घेऊ नका...आई-वडिलांनी पाठवलेला पैसा काटकसरीने वापरून त्याचे काहीतरी चीज करा...आई-वडिलांच्या विचारानुसार निर्णय घेण्याची क्षमता ठेवा.. आई वडिलांच्या माघारी पळून जाऊन लग्न करण्याची चूक करू नका... तरच आई-वडिलांना समाजात किंमत राहील...आई-वडिलांची मान अभिमानाने उंचावेल...

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

पान १ वरुन

### जालना शहराला ...

पाण्याची टाकी उभारण्यासाठी १३० कोटी, जालना जळगाव नवीन रेल्वे मार्गास सात हजार कोटी मंजूर करून भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे, जालना शहरासाठी सोलर प्रकल्प करिता शंभर कोटी, शहरातील निजाम कालीन लोखंडी पुलाच्या कामास १३.५ कोटी रुपये, शहरात सिमेंट काँक्रीट चौपदरीकरण १८ किलोमीटरचा वळण रस्ता, जालना शहरातील अंतर्गत रस्त्यासाठी दोनशे कोटी, ओपन जिम साठी सुमारे तीन कोटी, केंद्र शासनाच्या अमृत योजनेच्या अंतर्गत भूमिगत गटार योजनेसाठी ६५ कोटी, राजुर गणपती तीर्थक्षेत्रास तीस कोटीची विकास कामे केली, त्यामुळे भाजपचा महापौर होण्यासाठी जनतेने भाजपचे सर्व उमेदवारांना विजयी करावी व जालना शहराला स्मार्ट सिटी करण्यासाठी सहभाग नोंदवावा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, माजी आमदार कैलासजी गोरंटयाल यांच्यासह प्रभाग क्र.१३ उमेदवार सौ. भाग्यश्री जोगस सौ. अनामिका पांगारकर श्री. महेश निकम श्री. ज्ञानेश्वर ढोबळे व प्रभाग क्र.१६ मधील श्री. विनोद रत्नपारखे सौ. कल्याणी पवार सौ. सुचिता टेकाळे श्री. आदित्य बोराडे यांची उपस्थिती होती.

# स्वामी विवेकानंद; महान युगपुरुष

स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला.स्वामी विवेकानंद यांची आवड आणि अभ्यास प्रगल्भ होता.त्यांना संगीत, साहित्य आणि तत्वज्ञान यात विशेष रस होता.याव्यतीरीक्त पोहणे, घोडेस्वारी व कुस्ती हे त्यांचे आवडते छंद होते. वयाच्या २५ व्या वर्षी स्वामीजींनी वेद,पुराण, बायबल, कुराण,धम्मपद,तनाख, गुरू ग्रंथ साहिब,दास कॅपिटल, भांडवलशाही, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र या सर्वच विचारधारा एकत्र केलेल्या होत्या.म्हणजे त्यांना इतर सर्व ज्ञान तर होतेच परंतु जगातील संपूर्ण धर्माचा अभ्यास त्यांनी अवगत केलेला होता.यावरून असे वाटते की स्वामी विवेकानंदांना संपूर्ण ब्रम्हांडाचे ज्ञान असल्याचे दिसून येते.याला दैवी शक्तीच म्हणावे लागेल.कालांतराने रामकृष्ण परमहंस यांच्या आश्रयाला गेले व रामकृष्ण परमहंस यांच्या रहस्यमय व्यक्तीतत्वाने ते अत्यंत प्रभावीत झाले आणि त्यांचे संपूर्ण जीवन बदलले.स्वामींनी १८८१ मध्ये रामकृष्ण परमहंस यांना आपले गुरू केले.१८८६ मध्ये रामकृष्ण परमहंस यांच्या मृत्यूनंतर स्वामी विवेकानंदांच्या कार्याला एक नवीन वळण आले.वयाच्या २५ व्या वर्षी त्यांनी भगवे वस्त्र धारण केले व संपूर्ण भारतभर पायी प्रवास सुरू केला.देशातील गरीबी आणि सामाजिक दुष्टांची अवस्था पाहून त्यांची मनस्थिती दु:खावली गेली.काही दिवसांतच शिकागो येथे जगातील धर्म परिषद होणार असल्याची माहिति मिळाली.११सप्टेंबर १८९३ ला शिकागो येथे जगातील धर्म परिषद भरली.भारताचे प्रतिनिधी म्हणून स्वामी विवेकानंद तेथे पोहोचले. तिथे अनेकांनी खूप प्रयत्न केले की स्वामी विवेकानंद यांना बोलायला वेळ मिळुन नये.परंतु एका अमेरिकन प्राध्यापकाच्या प्रयत्नाने त्यांना बोलायला थोडा वेळ मिळाला.त्यानी जागतिक धर्म परिषदेतील धर्म संसदेतील भाषणाची सुरुवात बंधु व भगिनीअसे करून केली. यानंतर त्यांच्या भाषणाचे विचार ऐकून संपूर्ण धर्म परिषद स्तब्ध झाली व टाळ्यांचा कडकडाट झाला जनुकाय आकाशवाणी झाली की काय आणि स्वामी विवेकानंद जगप्रसिद्ध झाले व त्यांचे अमेरिकेत जोरदार स्वागत झाले.




युगानुयुगे आपल्या तेजस्वी विचारांची ज्योत संपूर्ण जगात सकारात्मक व शांती प्रदान करणारी रहावी या उद्देशाने स्वामी विवेकानंद यांनी आपले कार्य पुढे सुरूच ठेवले. एकतेचा संदेश जगाला देऊन सर्व मानवजातीला बंधुतेचा, मानवतेचा संदेश देणारे व सुखशांती निर्माण करणारे कार्य स्वामी विवेकानंद यांनी केले.त्यांनी जगाचा इतिहास आणि पाश्चात तत्वज्ञानांचा अभ्यास महाविद्यालयीन जीवनातच केला. अनेक धर्माच्या तात्विक अभ्यासामुळे त्यांनी अमेरिकेतील शिकागो येथे भरलेल्या सर्वधर्म परिषदेत हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व त्यांनी केले. ११ सप्टेंबर १८९३ या दिवशीच्या त्यांच्या भाषणाने संपूर्ण सभा प्रभावित झाली व १७ दिवसाच्या या परिषदेत हिंदुस्थानातील प्रभाव दिसून आला.मुलांचा सर्वांगीण विकास व त्यांच्या कौशल्यांचा विकास व्हावा, मुले आत्मनिर्भर व्हावी असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांच्या या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता आजच्या युवा पिढींनी अवगत करायला हवी.मूलांचा शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक विकास होऊन मन,बुद्धी विकसित करणारे, स्वावलंबी, चारित्र्यसंपन्न ओळख निर्माण करणारे शिक्षण असावे असे त्यांचे मत होते. भारताच्या आध्यात्मिक संस्कृतीबद्दल गाड अभिमान असला, तरी त्यात शिरलेल्या अनिष्ट रुढी, परंपरा, जातीभेद यांसारख्या हीन गोष्टींवर त्यांनी भाषणांतून कडाडून हल्ला चढवला. निराकार समाधीत मन रहाण्याची स्वत:ची स्वाभाविक प्रवृत्ती बाजूला सारून त्यांनी सर्वसामान्य लोकांच्या सुखदुःखाचा योग्य पातळीवरही विचार केला आणि त्यांच्यासाठी झटले व सर्वस्वाचे समर्पण म्हणजेच खरा संन्यास' हे वचन सार्थ केले. स्वामी विवेकानंद हे सर्व तरुणांचे आजही प्रेरणास्थान आहेत. अशा या महान तत्त्वज्ञानी महापुरुषाला माझा सलाम.आज देशात आपल्याला जी काही एकता आणि बंधुता दिसून येत आहे त्याचे संपूर्ण श्रेय स्वामी विवेकानंदांना जाते.१८९९ साली स्वामीजींनी पुन्हा पश्चिमेकडे प्रवेश केला आणि भारतीय संस्कृतीचा, अध्यात्माचा संदेश प्रसारित केला.अशाप्रकारे परदेशातही त्यांनी भारताची भूमिका मांडण्याचे काम त्यांनी केले. असा तेजस्वी महापुरुष भारत भुमिला लाभला हे भारतीयांचे अहोभाग्यच आहे.आजही आपला देश स्वामी विवेकानंदांच्या विचारधारेवर चालतो ही भारतीयांसाठी स्वाभिमानाची बाब आहे.अशा महापुरुषांनी पुन्हा-पुन्हा जन्म घ्यावा असे वाटते.परंतु आजही स्वामीजींची आस्था सर्वांच्या ह्दयात घर करून आहे.मी संपूर्ण भारतवासीयांना विनंती करतो की स्वामी विवेकानंदांचे विचार अवश्य अवगत करावे. आपणा सर्वांचाच मार्ग सुखरूप व मोकळा होईल.जोपर्यंत सुर्य, चंद्र,तारे आहेत तोपर्यंत स्वामीजींचे विचार सर्वांच्याच ह्दयात राहिल. स्वामीच्या जयंती निमित्त प्रणाम.

# सामाजिक परिवर्तनासाठी जिजाऊंचे विचार पेरणं गरजेचं

सिंधू संस्कृती ही बहुजनांची मातृसत्ताक संस्कृती आहे.भारतात मूलतः मातृसत्ताक कुटूंब पध्दती प्रस्थापित होती. परंतु परकीय आर्यांच्या आक्रमणानंतर परकीयांनी लादल्या गेलेल्या पितृसत्ताक कुटुंब पद्धतीमुळे स्त्रीयांना अत्यंत हीन दर्जा देण्यात आला. त्यामुळे स्त्रीयांच्या नैसर्गिक बुध्दीमत्तेला,कार्यक्षमतेला अतिशय गौण स्थान प्राप्त झाले. प्रस्थापित समाज व्यवस्थेने स्त्रीयांना स्वतःचं असं अस्तित्व निर्माण करण्याची संधीच कधी प्राप्त होऊ दिली नाही. अंधश्रध्देत समस्त स्त्रीयांना गुंतवून,अनेक भाकडकथा त्यांच्यासमोर ठेवण्यात आल्या.तसेच त्यांना धर्माच्या चौकटीत करकचून बांधुन ठेवण्यात आलं. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत स्त्री गुलामीत कशी राहील याचा कडेकोट बंदोबस्त प्रस्थापित समाज व्यवस्थेने केला.गुलामी व्यवस्थेचा पगडा त्यांच्यावर आरुढ करण्यात आला. पण अशा प्रतिकूल परिस्थितीतसुध्दा संधी मिळेल तेव्हा,स्त्रीने आपलं अस्तित्व व कर्तृत्व सिध्द केल्याचं आपल्याला आपल्या इतिहासात दिसून येईल.भारतीय इतिहासाला लाभलेलं असचं एक देदीप्यमान स्त्रीरत्न म्हणजेच स्वराज्य संकल्पिका राजमाता, राष्ट्रमाता,जिजाऊ माँसाहेब...!

अवघं विश्व निर्माण करणारी मातृशक्ती व स्वराज्याकडून सुराज्याकडे नेणारी राष्ट्रभक्ती.यश,किर्ती,स्वाभिमान आणि मातृत्वाचं लेणं यदूवंशाकडून घेऊन,सार्वभौमत्वाचा वारा अंगा खांद्याशी खेळत, सळ-सळत रक्त घेऊन,मराठी मुलुखात संचार करणारी, एक जीवनजागृत असं एक केंद्र,तसेच केवळ विदर्भ, मराठवाडा किंवा महाराष्ट्राचीचं नव्हे तर अवघ्या राष्ट्राची, प्रेरणाशक्ती म्हणजेचं आईसाहेब जिजाऊ...! ज्या वयात मुली खेळ,भांडे मांडून खेळ खेळण्यात दंग असतात,त्या वयात समशेर हाती घेऊन जिजाऊ पारतंत्र्य,लाचारी,फितुरी या बाबींचा मनापासून तिरस्कार करु लागल्या. गोर-गरिब रयतेचे हाल उघड्या डोळ्यांनी पाहू लागल्या,तशी अन्यायाची आग मनोमन पेटत गेली आणि यातुनचं जिजाऊच्या मनात स्वराज्य संकल्पनेची निर्मिती झाली व स्वराज्याचं देखणं स्वप्न साकार झालं. म्हणुनचं म्हणतात,'शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी.' एकीकडे विचार केला तर गर्भधारणेच्या काळात स्त्रीयांना चिंच, कैरी खाण्याचे डोहाळे लागतात,तर तेचं दुसरीकडे पर्वतावर चढून जावे, सुर्वण सिंहासनावर आसनस्थ व्हावे,उंच ध्वज फडकवावा,नगा-यांचा आवाज ऐकावा, किल्ले जिंकून घ्यावे,असे शिवराय उदरात असताना डोहाळे लागणा-या माँ साहेब जिजाऊ!स्वतः चिलखत घालून, तलवार हाती घेऊन,त्या काळी शत्रूविरूध्द रणांगणात उतरून लढणा-या एकमेव रणांगिनी म्हणजे राजमाता जिजाऊ,या आजच्या काळातील संकुचित विचार ठेवून,मानसिक दबावाखाली मुलांना वाढविणा-या स्त्रीयांनी ख-या अर्थीने समजून घेतल्या पाहिजेत.शिवबा मृत्यू



हा एकदा येणारा चार,तो भ्याडपणाने येण्याऐवजी,तो रणांगणात लढताना येणे हे खरे वीर पुरुषाचे लक्षण होय.आपल्या ध्येयासाठी लढणे गैर नाही,पण आत्मसन्मान, स्वातंत्र्य गहाण ठेवून आपल्याला जगायचं नाही. त्याचबरोबर शिवबा केवळ आमचा पुत्र नाही,तर अवघ्या मराठी जनांचा स्वाभिमान आहे. या मातीच्या स्वातंत्रयासाठी असे कित्येक पुत्र गमावले तरी बेहत्तर. पण भ्याडपणे पळून जाऊन, मराठी मुलुखाचा स्वाभिमान गमावता कामा नये.असं सांगणारे जिजाऊ विचार खरोखरचं एक स्फुर्ती निर्मीण करणारे आहेत.

वास्तविकतेचा विचार केला तर सध्याच्या काळात सामाजीक परिवर्तन घडवून आणण्यासाठी जिजाऊ विचार समाजात पेरणं खुप गरजेचं आहे. कारण जोपर्यंत समाजात जिजाऊ विचार पेरले जाणार नाहीत. तो पर्यंत आपल्या समाजात शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांसारखे महापुरुष जन्माला येणार नाहीत.त्यासाठी समाजात जिजाऊ विचारांचा जागर घडवून आणणे महत्वाचे आहे.जिजाऊ विचार म्हणजे नेमके काय?तर ज्या मातेला आपलं मुल जन्माला आल्यानंतर,त्या मुलाने स्वतःच अस्तित्व स्वतः निर्माण केलं पाहिजे, पारतंत्र्यात जीवन न खर्च करता, स्वबळावर स्वतःच एक वेगळ विश्व निर्माण केलं पाहिजे, त्यासाठी ती माता कुणाचेही दास्यत्व न पत्कारता स्वतः स्वंयपूर्ण होते व आपल्या मुलाला स्वंयपूर्ण बनवते,हे आहेत जिजाऊ विचार.या प्रेरक जिजाऊ विचारांतूनचं अन्यायाला वाचा फोडून, बेचिराख करुन रयतेचं स्वराज्य प्रस्थापित करणारे छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांसारखे छावे या मराठी मुलुखाला प्राप्त झाले.हे आपल्याला आपल्या सुवर्ण इतिहासाने दाखवून दिले आहे.

'स्त्री ही क्षणकालाची पत्नी आणि अनंतकालाची माता असते.'हे विधान जिजाऊच्या बाबतीत अगदी यथार्थ आहे. शहाजी राजेंच्या देहावसनानंतर परंपरेप्रमाणे सती न जाता, पतीला परमेश्वर मानून त्याची पूजा करत बसण्यापेक्षा, पतीच्या कार्यात स्वतः ला समर्थपणे झोकून देत व समर्थपणे स्वतंत्र राज्यकारभार चालवून भारतीय इतिहासात जिजाऊनी स्त्री कर्तृत्वाचा एक महान असा ठसा निर्माण केला. तसेच ज्या काळात अस्पृश्यांची सावली जरी पडली तरी महापाप समजलं जायचं त्या काळात अस्पृश्यांना समान न्याय,हक्क व आश्रय देऊन सर्वांना स्वराज्याच्या एका धाग्यात गुंफून समाजात परिवर्तनवादी ज्योत पेटवण्याचे काम या माऊलीने केले.यातूनचं जिजाऊंच्या निःपक्षपातीपणाचे व कणखर बाण्याचे दर्शन आपल्याला घडते.जिजाऊंच्या या प्रेरणादायी विचारांचे मंथन आजच्या काळातील प्रत्येक स्त्रीने केले पाहिजे. तेव्हाच प्रत्येक घरा-घरात जिजाऊ निर्माण होतील व या जिजाऊच्या पोटी वीर शिवबांसारखे महान पराक्रमी,महापुरुष जन्माला येऊन,आपल्या राष्ट्राचा उज्वल व देदीप्यमान इतिहास पुन्हा जगासमोर येईल,यात शंकाच नाही. जय जिजाऊ! जय शिवराय! जय शंभूराजे!!

**कु.कल्पना कल्याण घुगे**
**रा.पिंपरखेड(बु),ता. घनसावंगी,**
**जि.जालना मो.नं.८३९०२१७६१४**

# मातृभुमीला सुवर्णभुमी करणारी राष्ट्रमाता जिजाऊ

मातृभुमीच्या काळ्या मातीत सोन्याचा नांगर फिरवून सुवर्णभुमीची स्वप्नच नव्हे तर विश्वातील दोन आदर्श छत्रपती घडवून प्रत्येक्षात रयतेच स्वराज्य निर्माण करून सुवर्णभूमी निर्माण करणाऱ्या राजमाता राष्ट्रमाता माँ जिजाऊंचा १२ जानेवारी जन्मदिन मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे मोठया थाटात संपन्न होत आहे.

जिजाऊ शब्द किंवा नावाचा ध्वनी नसून उत्तुंग आदर्श मातृत्वाचा निरंतर वाहणारा निर्झर आहे.या गौरवशाली मातृत्वाच्या अत्युच्च शिखराला जगात तोड नाही. आदर्श ममतेचा,संस्काराचा,शौर्याचा,धैर्याचा, स्वराज्याचा ज्वलंत साक्षात्कार म्हणजे मा.जिजाऊ...

१२ जानेवारी १५९८ हा दिवस स्वराज्याची नवी पहाट घेवुन उगवला,वैभवशाली यादव कुळातील लखुजी जाधवांच्या घरी म्हाळसाराणीच्या पोटी एका दैदिप्यमान कन्येने सिंधखेडराजा येथे जन्म घेतला. कन्याप्राप्तीचे स्वप्न साकार होण्याच्या या घटनेने आनंदित होवून राजे लखुजी जाधवांनी हत्तीवरुन साखर वाटली.राजघराण्यातील या कन्येला राजकारण,घोडस्वारी,तलवारबाजी,मुसद्देगीरी,युद्धकलेचे धडे घरातुनच गिरवता आले.१६१० शहाजी सोबत जिजाऊंचा विवाह झाला ही स्वराज्य स्थापनेतील महत्वाची घटना. या वीर मातेच्या जीवनात आलेला एक एक प्रसंग व त्या प्रसंगाला धिरोदात्तपणे केलेला सामना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक एक पैलू आपल्याला उजागर करतो. मा.जिजाऊंनी त्यांच्या जीवनात जी संकटे प्रत्येक्ष अनुभवली ती जगातल्या एकाही मातेने अनुभवली नसावी. विवाहाच्या चार वर्षापुर्वीच १६०६ मध्ये सासरे मालोजी इंदापूरच्या लढाईत मारले गेले.काका शरीफजी व आई उमाबाईने शहाजीला सर्व बाबतीत परिपूर्ण बणवले होते. शहाजीराजे महान योध्दा राजनितिज्ञ विद्वान त्याचबरोबर महान दुरदृष्टीचा पितासुद्धा होते. स्वराज्याचे डोहाळे लागलेल्या अशा या वीरमातेने १९ फेब्रुवारी १६३० मध्ये शिवनेरी किल्यात एका छत्रपतीला जन्म दिला ते विश्ववंदे छत्रपती शिवराय. स्वतःच्या मुलाएवढेच कड्याकपारी राहणारे आदिवासी रामोशी भिल्ल कोळी कुणबी तेली माली महार,मांग....अठरापगड जातीच्या लोकांना आपल्या ममतेच्या पदराखाली घेवून प्राणाला प्राण देणारे मावळे तयार करणारी वात्सल्याची मुर्तीवंत उदाहरण म्हणजे मा जिजाऊ.... रयेतेच्या केसालाही धक्का लागणार नाही अशी रयतेची काळजी घेणारा,शेतकऱ्यांच्या पिकाच्या देठालाही हात लावता कामा नये असा फर्मान काढणारा,प्रत्येक स्त्री ही आपल्या मातेसमान बघणारा व त्यांच्या सन्मानासाठी व रक्षणासाठी कठोर शिक्षा करणारा,स्वराज्यातील प्रत्येक मनसावर सारखं प्रेम करणारा,सैन्यातील प्रत्येक जाती धर्माच्या आपल्या मावळ्याला मुलाप्रमाने वागणूक देणारा,त्यांच्या धार्मिक भावना जोपासनारा असा धर्मनिरपेक्ष विश्वातील महापराक्रमी आदर्श छत्रपती घडवतांना या मातेने स्वतः कोणत्याही संस्काराची तथा शिक्षणाची उनिव बाकी ठेवलीली नव्हती.मा जिजाऊंनी स्वराज्य निर्मितीसाठी शिवाजीला एवढेच नव्हे तर नातू संभाजीला सुद्धा घडविण्यात कसलीही कसर ठेवलेली नव्हती. जगात महान असे दोन दोन छत्रपती घडवणार्या राजमाता जिजाऊंना जगात तोड नाही.अशी संस्काराची खान असणाऱ्या आदर्श माता आदर्श गुरु मा.जिजाऊच... खंडागळेच्या हत्ती प्रकरणावरुन झालेल्या गृहयुद्धात भावा दिराचा खुन,निजामाने कपटाने पित्याची भावांची केलेली क्रुर हत्त्या ,स्वराज्याच्या रणरणत्या धावपळीच्या दगदगीत गमवावी लागलेली स्वतःची चार अपत्ये,पती शहाजीचा मृत्यु,स्वराज्याच्या चहोबाजूंनी शत्रूचा वेढा या सर्व घटनांना धिरोदात्तपणे पाशवी रुढी परंपरा कर्मकांड अंधश्रद्धांना लाथाडून सामना करणारी योद्धा म्हणजे वीरमाता जिजाऊ... स्वराज्याच्या स्थापनेसाठी राजकिय मुसद्देगीरीत निंबाळकर,मोहिते, पालकर,इंगळे, शिर्के, गायकवाड, विचारे, जाधव,अशा मात्तब्बर सरदारांच्या मुलींसी आपल्या शिवबाचे विवाह लावून रक्ताचे नातेसंबंध प्रस्थापित करुन त्यांचा होणारा विरोध मोडून काढला यावरुन लक्षात येते की स्वराज्य स्थापनेसाठी मुसद्देगीरीला जगात तोड नसणाऱ्या मुसद्धी राजनितीज्ञ मा.जिजाऊच... अफजलखानाची भेट असो ,पुरंदरला मोगलांचा वेढा असो,लाल महालात शाहिस्तेखानावरील छापा असो,औरंगजेबाच्या दाढेत जावून आग्र्याला शिव शंभू ची भेट असो, की पन्हाळगडाच्या वेढ्यातून सुटका असो .....अशा स्वराज्यावरील महाकाय संकटात पोटच्या गोळ्याला शत्रूच्या दाढेत लोटून स्वराज्याचा एकच ध्यास घेतलेल्या जगातल्या एकमेव आदर्श स्वराज्य संकल्पीका राष्ट्रमाता राजमाता मा जिजाऊच.. शुद्रांने राजा बणता कामा नये या महाराष्ट्रातल्या पुरोहितांनी राज्यभिषकाला केलेल्या विरोधाला न जुमानता सगळ्या विरोधावर मात करुन तत्कालीन मान्यतेप्रमाने छत्रपती चे छत्र धारण करण्यासाठी स्वराज्याची तिजोरी पणाला लावली.काशीवरुन पुरोहित गागाभट्टाला आणून ६ जुन १६७४ ला राज्यभिषक करवून स्वराज्याचा जगातला पहिला आदर्श छत्रपती आपल्या डोळ्यात साठवूनच स्वराज्याची स्वप्न साकार करणाऱ्या या वीर राष्ट्रमातेने स्वराज्यासाठी आपल्या आयुष्यचा त्याग करुन स्वराज्याचे स्वप्न पूर्ण करुनच या राजमातेने राज्यभिषकानंतर अवघ्या अकरा दिवसांनी १७ जुन १६७४ ला रायगडाच्या पायथ्याशी पाचाडच्या वाड्यात अखेरचा श्वास घेतला. अशा या धेय्यनिष्ठ,राजनिष्ठ,कर्तव्यदक्ष, दृढनिश्चयी, रयत हेच कुटुंब अशी रयतेप्रती कुटुंबवत्सलता,आदर्श मातृत्व,संस्काराची खाण,स्वराज्य संकलपनेच्या त्यागमुर्ती,आदर्श गुरु असलेल्या राष्ट्रमाता राजमाता मासाहेब जिजाऊंना त्यांच्या जन्मोत्सवी शत शत वंदना...

# आकणी येथे आजी-माजी विद्यार्थी व पालक मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**जालना | प्रतिनिधी -** दि.१० जानेवारी शनिवार रोजी आजी-माजी विद्यार्थी तसेच पालकांचा संयुक्त मेळावा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थित मान्यवरांसह माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

या मेळाव्यास गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत शाळेसाठी निधी संकलनातही भरभरून प्रतिसाद दिला. सरपंच तथा उद्योगपती कल्याणराव बोराडे यांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ती मदत सातत्याने केली जाईल, अशी शाश्वती मुख्याध्यापक कैलास उबाळे यांना दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच कल्याणराव बोराडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून गट शिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण, विस्तार अधिकारी के. जी. राठोड, तसेच सोनाबापू बोराडे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लखन मोरे,सर्व सदस्य,ग्रामपंचायतचे उपसरपंच, तसेच शिक्षण विभागातील अनेक शिक्षणप्रेमी शिक्षकही यावेळी उपस्थित होते.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश लोमटे यांनी केले तर मुख्याध्यापक कैलास उबाळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यानंतर गट शिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण, मुख्य मार्गदर्शक व व्याख्याते सेवानिवृत्त प्राचार्य रंगनाथ खेडेकर, विस्तार अधिकारी के. जी. राठोड, सरपंच कल्याणराव बोराडे तसेच माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

जिल्हा परिषद शाळांचे महत्त्व अधोरेखित करत जिल्हापरिषद शाळांतील विद्यार्थीच पुढे जीवनात यशस्वी ठरत असल्याचे अनुभव त्यांनी सांगितले.

मुख्याध्यापक कैलास उबाळे यांनी अवघ्या सहा महिन्यात येथील शाळेचा चेहरा मोहरा बदलून शाळेचा व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केल्याने गावकऱ्यांसह मान्यवरांनी त्यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक करत अभिनंदन केले.

दरम्यान यावेळी उपस्थितांनी पालकांना इंग्रजी माध्यमाच्या आकर्षणाला बळी न पडता जिल्हा परिषद शाळेतच आपल्या पाल्यांचे शिक्षण देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास आजी-माजी विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक विठ्ठल तरवटे शिक्षिका स्वाती बनसोडे, अमोल लोहटे, रामेश्वर मुसळे यांनी परिश्रम घेतले.

## स्वच्छ व सुंदर जालना शहरासाठी मतदारांनी भाजपला साथ द्यावी - माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर

**जालना | प्रतिनिधी -** जालना शहर स्वच्छ, सुंदर व विकसित बनवण्यासाठी तसेच प्रत्येक नागरिकाच्या घरापर्यंत दररोज नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी जालना शहरातील मतदारांनी भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करून साथ द्यावी, असे आवाहन माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर यांनी केले.

जालना महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते नागरिकांशी संवाद साधतांना बोलत होते कि, मी पाणीपुरवठा मंत्री असताना संपूर्ण महाराष्ट्रात 'वॉटर ग्रीड ही महत्त्वाकांक्षी पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली. मात्र २०१९ मध्ये उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना ही योजना बंद पाडण्याचा प्रयत्न करण्यात आला. जालना शहराला विकासाच्या दिशेने पुढे नेण्यासाठी भाजपला एक संधी दिल्यास शहर स्वच्छ, सुंदर आणि मूलभूत सुविधांनी परिपूर्ण करण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.




त्यामुळे मतदारांनी भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करून विकासाला साथ द्यावी, असे त्यांनी सांगितले.

यावेळी आ. संतोष पाटील दानवे, माजी आमदार निवडणूक प्रमुख कैलासजी गोरंट्याल, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, भाजपा प्रदेश सचिव राहुलभैया लोणीकर, माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, वसंतराव जगताप, बबनराव सिरसाठ आदी मान्यवर उपस्थित होते.

## सोमठाणा खून प्रकरणाचा छडा लावणाऱ्या बदनापूर पोलिसांचा पोलीस अधीक्षकांच्या हस्ते गौरव



**बदनापूर | प्रतिनिधी -** तालुक्यातील सोमठाणा येथे घडलेल्या बहुचर्चित खून प्रकरणाचा अत्यंत कौशल्याने छडा लावून आरोपींना गजाआड करणाऱ्या बदनापूर पोलीस ठाण्याच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा जालना जिल्हा पोलीस दलाच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन या पथकाला गौरविण्यात आले.

गुन्ह्याचा तपास आणि कामगिरी काही दिवसांपूर्वी सोमठाणा परिसरात खुनाची घटना घडली होती. या गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली बदनापूर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली होती. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी या गुंतागुंतीच्या प्रकरणाचा छडा लावून गुन्हेगारांना जेरबंद केले. या विशेष कामगिरीची दखल घेत पोलीस अधीक्षकांनी पूर्ण पथकाचे कौतुक केले.

सन्मानित करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी पोलीस अधीक्षक कार्यालयात आयोजित कार्यक्रमात खालील अधिकारी व अंमलदारांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले: मच्छिंद्र सुरवसे (पोलीस निरीक्षक, बदनापूर पोलीस ठाणे), राठोड (सहाय्यक पोलीस निरीक्षक, संतोष कुलाकरे (पोलीस उपनिरीक्षक), अब्दुल बारी अब्दुल अजिज शेख (पोलीस अंमलदार), बारवाल (पोलीस अंमलदार), शेख इस्माईल (पोलीस अंमलदार), प्रीती जाधव (महिला पोलीस अंमलदार), सानप (पोलीस चालक) कर्तव्यदक्षतेचे सर्वत्र कौतुक गुन्हेगारांना जरब बसवण्यासाठी आणि गुन्ह्यांची उकल करण्यासाठी बदनापूर पोलिसांनी दाखवलेल्या या तत्परतेबद्दल तालुक्यातून त्यांचे अभिनंदन होत आहे. अशा प्रकारच्या गौरवपूर्ण कामामुळे पोलीस दलाचे मनोबल वाढते आणि सामान्यांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ होतो, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

# जालन्यामुळे जगाचा इतिहास बदलला - डॉ. संजय जगताप

### स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे थाटात विमोचन

**जालना | प्रतिनिधी -** जालना जिल्ह्याला केवळ ऐतिहासिक वारसा नाही, तर या मातीने जगाचा इतिहास बदलण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. १८०३ मध्ये जालना जिल्ह्यातील आसई येथे झालेली लढाई ही जागतिक इतिहासाला कलाटणी देणारी ठरली, असे प्रतिपादन डॉ. संजय जगताप यांनी केले. स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्यावतीने आयोजित दिनदर्शिका विमोचन सोहळ्यात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.



कार्यक्रमाला डॉ. रामेश्वर साबळे, कृषी उद्योजक गणेश पडूळ आणि ॲड. गणेश तौर यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. जगताप यांनी आपल्या अभ्यासपूर्ण संकलनातून जालन्याचा जागतिक संबंध अधोरेखित केला. ते म्हणाले की आसईची ही लढाई इंग्रज आणि मराठा यांच्यात झाली. यात इंग्रजांचा सेनापती आर्थर वेलस्ली होता. ही लढाई इंग्रजांना अत्यंत जड गेली होती. मात्र, हरता हरता कठीण परिस्थितीतही मानसिक स्थैर्य आणि खंबीर राहून वेलस्लीने लढाई जिंकली. वेलस्लीने स्वतः कबूल केले होते की, ही त्याच्या आयुष्यातील सर्वात कठीण लढाई होती. जालन्यातील या विजयामुळेच वेलस्लीची निवड युरोपमध्ये नेपोलियन बोनापार्ट विरुद्ध लढण्यासाठी सात देशांचा सेनापती म्हणून झाली. जर वेलस्ली जालन्यात (आसई येथे) हरला असता, तर तो वॉटरलूच्या लढाईत नेपोलियनला हरवू शकला नसता आणि आज जगाचा नकाशा व इतिहास पूर्णपणे वेगळा असता. याच वेलस्लीने पुढे दोन वेळा ब्रिटनचे पंतप्रधान पद भूषवले आणि तो 'ड्यूक ऑफ वेलिंग्टन' म्हणून ओळखला गेला, अशी माहिती डॉ. जगताप यांनी दिली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात सांगितले की, स्वामी विवेकानंद पतसंस्था मागील २२ वर्षांपासून सभासदांच्या विश्वासावर उभी आहे. समाजापर्यंत स्वामीजींचे प्रेरणादायी विचार पोहोचावेत, या उद्देशाने या दिनदर्शिकेत त्यांच्या निवडक सुविचारांचा समावेश करण्यात आला आहे. हे विचार दैनंदिन जीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या सोहळ्याला संस्थेचे उपाध्यक्ष कैलास पवार, सचिव प्रसन्ना जाफराबादकर, संचालक नाना जोशी, राजेश बगळे यांच्यासह अनेक मान्यवर आणि संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दिनदर्शिकेचे विमोचन करून उपस्थितांना जालन्याच्या गौरवशाली इतिहासाची ओळख करून देण्यात आली.

## जालना शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करा - रावसाहेब दानवे



**जालना | प्रतिनिधी -** जालना शहरात प्रथमच होत असलेल्या महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ व शहराचा सर्वांगीण विकास तसेच जालनाला स्मार्ट सिटी म्हणून विकसित करण्यासाठी भाजपच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन माजी केंद्रीय राज्यमंत्री व भाजपचे ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील दानवे यांनी केले.

प्रभाग क्रमांक १ मधील भाजपच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ (दि.९) रोजी श्रीकृष्णनगर व जिजामाता कॉलनी येथे प्रचारादरम्यान यावेळी नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभला. परिसरातील महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मतदारांशी संवाद साधतांना दानवे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने देशभरात पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, घरकुल, आरोग्य व शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली आहेत. माझ्या भाजप प्रदेशाध्यक्षपदाच्या काळात तसेच केंद्र सरकारमध्ये दोन वेळा मंत्री असताना जालना शहरासाठी कोट्यवधी रुपयांचा विकासनिधी मंजूर करून अनेक महत्त्वाची कामे पूर्ण केली आहेत. उर्वरित कामे पूर्ण करून शहराला आधुनिक व स्मार्ट सिटी बनवण्यासाठी महापालिकेची सत्ता भाजपच्या हाती असणे अत्यावश्यक आहे. भाजपच्या नेतृत्वाखाली महापालिका स्थापन झाल्यास विकासासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशात पंतप्रधान भाजपचे, राज्यात मुख्यमंत्री भाजपचे असल्यामुळे जालना शहराचा पहिला महापौरही भाजपचाच व्हावा, यासाठी जालना शहरातील सुज्ञ मतदारांनी भाजपला संधी द्यावी व सर्व उमेदवारांना कमळ या चिन्हासमोर बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन दानवे यांनी यावेळी केले.







संक्रांत चार दिवसावर येऊन ठेपली असून मार्केटमध्ये घेवरफेणीचे व तिळाचे लाडू यांच्या दुकानात थाटले असून आनंद घेवर घेणे स्वीट मार्ट यांची ४० वर्षाची जुनी परंपरा असून त्यांच्याकडे डालडा घेऊन येणे रुपये किलो गोड व फिक्की घेवर फेणी चारशे रुपये किलो असली तुपाची घेवर पिणे ६५० रुपये किलो साखर नसलेली ७५० रुपये किलो तीळ३०० पापडी अर्धा किलो २२० रुपये तीळ लाडू ४०० रुपये किलो व बाजारात प्लास्टिक व स्टीलचे वाणाचे साहित्य व तीळ हळदीकुंकू मार्केटमध्ये उपलब्ध झालेली दिसून येत आहे (छायाचित्र - किरण खानापुरे)

केहाळ वडगाव जि.प प्रा. शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात

# बाल आनंद मेळाव्यातून विद्यार्थ्यांना 'कमवा व शिका'ची अनुभूत



**मंठा । प्रतिनिधी -** मंठा तालुक्यातील केहाळ वडगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ज.न.प. तांडा जि.प.प्रा.शाळा व नूतन वसाहत जि.प. प्रा. शाळा या तिन्ही शाळांचा संयुक्त विद्यार्थी बाल आनंद मेळावा उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांना 'कमवा व शिका' या संकल्पनेची जाणीव व्हावी तसेच विविध व्यवसाय व व्यवहाराची प्रत्यक्ष माहिती मिळावी, या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन विविध खाद्यपदार्थ व वस्तूंचे स्टॉल उभारले. यामध्ये पाणीपुरी, भेळ, पालेभाज्या, गुलाबजामुन, आप्पे, कचोरी, वडापाव, इडली, मसाला पापड, भजी, पॅटिस, ढोकळा,पोहे आदी खाद्यपदार्थांचा समावेश होता.

कार्यक्रमाचे उद्घाटन केंद्र प्रमुख एस.वाय सस्ते, जयभवानी विद्यालयाचे प्राचार्य रा. ना. अंभुरे, पी. आर. डुकरे (सहशिक्षक, प्रा.शा. शिवनगिरी), मुख्याध्यापक प्रा.शा. केहाळ वडगाव आर. यू. आंबटकर, एन. बी. हरणे, एस. आर. राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहशिक्षक डी. डी. भुस्कुटे, व्ही. एम. कांबळे, आर. टी. चव्हाण, डी. एस. जाधव आदींनी विशेष परिश्रम घेतले. मेळाव्यात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने व्यवहार करून आनंद लुटत उद्योगशीलतेचे धडे प्रत्यक्ष अनुभवातून आत्मसात केले.



नवीन जालन्यातील दवा मार्केटकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था मोठाले गड्डे पडून पाणी साचले ते दिसून येत आहे. (छायाचित्र किरण खानापुरे)

# अग्रशक्ती बहु मंडळाचा पदग्रहण सोहळा व २० वर्ष पूर्ती उत्साहात साजरी

**जालना । प्रतिनिधी -** येथील अग्रशक्ती बहु मंडळाच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा तसेच मंडळाच्या २० वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा उत्सव मंगळवार, दि. ७ जानेवारी रोजी शहरातील रुक्मिणी गार्डन येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास मंडळाच्या सदस्यांसह समाजातील मान्यवर महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

या सोहळ्यात अध्यक्षपदी सौ. नेहा शिरीष अग्रवाल, सचिवपदी सौ. रुची अर्पण गोयल, कोषाध्यक्षा म्हणून सौ. श्वेता सिद्धांत तवरावाला, उपाध्यक्षपदी सौ. नेहा विशाल गुप्ता, तसेच सहसचिवपदी सौ. पायल करण अग्रवाल यांनी पदभार स्वीकारला.

तसेच मार्गदर्शक (वींळीू) म्हणून सौ. सपना प्रेमेंद्र अग्रवाल व सौ. स्मिता राजेशपित्ती यांची नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात पदग्रहण समारंभाने झाली. नूतन कार्यकारिणी सदस्यांनी आपल्या पदाची शपथ घेतली. कार्यक्रमादरम्यान हळदी-कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी केक कटिंग करून मंडळाच्या २० वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आनंद साजरा करण्यात आला.

२० माजी अध्यक्षांचा विशेष गौरव



अग्रशक्ती बहु मंडळाच्या स्थापनेपासून आजपर्यंत अध्यक्षपद भूषविणाऱ्या २० माजी अध्यक्षा यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक व संघटनात्मक योगदानाबद्दल पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.माजी अध्यक्षांच्या मार्गदर्शनामुळेच मंडळाची वाटचाल अधिक सक्षम झाल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अग्रशक्ती बहु मंडळाच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आता एका फोनवर सुटणार नागरिकांच्या समस्या; विशेष हेल्पलाईन क्रमांक जारी

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील नागरिकांना आपल्या तक्रारी मांडण्यासाठी किंवा पोलीस सेवा मिळवण्यासाठी आता पोलीस ठाण्याच्या चकरा मारण्याची गरज उरणार नाही. नागरिकांच्या सोयीसाठी आणि त्यांच्या समस्यांचे तात्काळ निवारण करण्यासाठी जालना पोलीस अधीक्षक कार्यालयाने एक विशेष पुढाकार घेतला असून, एक नवीन हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित केला आहे. जालना पोलीस दलाने ९६४१२१११०० (९६४१२१११००) हा विशेष मोबाईल क्रमांक जाहीर केला आहे. हा क्रमांक पोलीस नियंत्रण कक्ष, जालना येथे उपलब्ध असेल, ज्याद्वारे सामान्य नागरिकांना पोलीस दलाशी थेट आणि सुलभ संपर्क साधता येईल. नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन त्यावर नियमानुसार तात्काळ कारवाई केली जाईल, असे आश्वासन पोलीस अधीक्षकांनी दिले आहे. नागरिक कोणत्या बाबींसाठी संपर्क साधू शकतात? या हेल्पलाईन क्रमांकावर नागरिक खालील सेवा आणि तक्रारींसाठी संपर्क साधू शकतात: प्रशासकीय पडताळणी: पासपोर्ट (पारपत्र) पडताळणी आणि चारित्र्य पडताळणी संदर्भातील माहिती किंवा अडचणी.
सभा, मिरवणुका आणि विविध कार्यक्रमांच्या परवानगीबाबत विचारणा. सार्वजनिक शिस्त: ध्वनी प्रदूषणासंदर्भातील तक्रारी. वाहतूक व्यवस्था: वाहतूक कोंडी, वाहतुकीतील अडचणी आणि वाहतूक चलनाबाबतच्या तक्रारी. इतर: इतर कोणत्याही नागरी समस्यांबाबत नागरिक येथे आपली तक्रार किंवा अर्ज देऊ शकतात.नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि पोलीस सेवा अधिक सक्षम करण्यासाठी जालना पोलीस दल सदैव तत्पर आहे, असे पोलीस प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या सुविधेचा जास्तीत जास्त नागरिकांनी योग्य वापर करून आपल्या समस्या नोंदवाव्यात, असे आवाहनही पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.
या नवीन उपक्रमामुळे पोलीस आणि जनता यांच्यातील समन्वय वाढण्यास मदत होणार असून, गुन्हेगारी नियंत्रण आणि नागरी समस्यांच्या निवारणात मोठी गती मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

प.पु. ब्रम्हनिष्ठ गुरु १००८ गंगाभारती बाबा यांच्या ३३ व्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

# श्रीमद् भागवत कथा व ज्ञानयज्ञ सोहळ्याचे भव्य आयोजन

**परतूर । प्रतिनिधी -** तालुक्यातील दैठना फाटा येथे परमपूज्य ब्रम्हनिष्ठ गुरु १००८ गंगाभारती बाबा यांच्या ३३ व्या पुण्यतिथीनिमित्त, त्यांच्या पावन स्मृतींना वंदन करण्यासाठी अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवत कथा व ज्ञानयज्ञ सोहळ्याचे भव्य आयोजन दरवर्षी प्रमाणे याही वर्षी करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्याची सुरुवात दि ९ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. १६ जानेवारी २०२६ रोजी काल्याच्या कीर्तनाने त्याची सांगता होईल. कैलास मधुकर सवने हे या अखंड हरिनाम सप्ताहातील भागवत कथेचे आयोजक असून, या सोहळ्याला परिसरातील हजारो भाविक उपस्थित राहणार आहेत.

या सप्ताहात सोहळ्यात दररोज पहाटे ४ ते ६ वाजेपर्यंत काकडा भजन होईल. त्यानंतर सकाळी ७ ते १० या वेळेत श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा पार पडेल. मुख्य आकर्षण असलेल्या श्री श्रीमद् भागवत कथेचे आयोजन सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत करण्यात आले आहे. भागवताचार्य ह.भ.प. विष्णुकांत महाराज (वागी संस्थान) हे रसाळ वाणीने भागवत कथेचे निरूपण करतील. दुपारी ३ ते ४ गाथाभजन, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ आणि रात्री ८ ते १० या वेळेत हरि किर्तन व जागर होणार आहे.




या अखंड हरिनाम सप्ताहात दररोज सुप्रसिद्ध कीर्तनकारांची रात्री आठ वाजता कीर्तनसेवा होणार आहे. दि ९/०१/२०२६ रोजी हभप. दत्ता महाराज सिंगोनकर यांचे कीर्तन होईल. तसेच दि १०/०१/२०२६ रोजी ह.भ.प. विष्णुकांत महाराज रासवे कीर्तन करतील. दि ११/०१/२०२६ रोजी ह.भ.प. मुकुंद महाराज गात यांच्या कीर्तनाचा लाभ घेता येईल. दि १२/०१/२०२६ रोजी ह.भ.प. अर्जुन महाराज मोटे यांचे कीर्तन होईल. दि १३/०१/२०२६ रोजी ह.भ.प. पांडुरंग महाराज उगले कीर्तन सेवा देतील. दि १४/०१/२०२६ रोजी ह.भ.प. नामदेव महाराज फपाळ यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आहे. दि १५/०१/२०२६ रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज सेलुदकर कीर्तन करतील. दि १६/०१/२०२६ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत काल्याचे कीर्तन ह.भ.प. सोपान महाराज सानप (शास्त्री) करणार आहेत. या धार्मिक कार्यक्रमाला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सप्ताह कमिटीने केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.